प्रेस नोट दिनांक २९/०३/२०२३

**तहसीलदार कार्यालय देवरुख, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथील मंडळ अधिकारी यांना लाच स्विकारताना व तलाठी यांनी लाचेची मागणी केली म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडलेबाबत..**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | रत्नागिरी युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | - |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. उल्हास विश्वनाथ मुरुडकर वय.४६ वर्षे, मंडळ अधिकारी, देवळे<br>२) श्री. संतोष महादेव मोघे वय. ५१ वर्षे, तलाठी सजा कनकाडी ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी |
| मागितलेली लाचेची रक्कम | २५,०००/-रुपये व ॲन्ड्राईड मोबाईल |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचे वडीलोपार्जित शेत जमीनीच्या सातबारा उता-यावर त्यांचे सहहिस्सेदार म्हणुन नाव नोंदविण्याकरीता तलाठी सजा कनकाडी यांचेकडे अर्ज सादर केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने श्री. मोघे तलाठी सजा कनकाडी व मंडळ अधिकारी देवळे श्री. मुरुडकर यांची भेट घेतली असता तलाठी मोघे यांनी सातबारा उता-यावर नाव नोंदवुन तशी फेरफार रजिस्टरला नोंद घालुन सदरची नोंद मंजुरीसाठी पाठविण्याकरीता १०,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली तसेच मंडळ अधिकारी मुरुडकर यांनी सदरची नोंद मंजुर करणेकरीता २५,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. मोघे व श्री. मुरुडकर यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी येथे दिनांक २८/०२/२०२३ रोजी लाच रक्कमेच्या मागणीची तक्रार दिलेली आहे.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २८/०२/२०२३ व दिनांक १३/०३/२०२३ रोजी पडताळणी कारवाई केली असता आरोपी लोकसेवक श्री. मोघे तलाठी सजा कनकाडी यांनी तक्रारदार यांचेकडे मोबाईल फोनची मागणी केलेली असुन लोकसेवक मंडळ अधिकारी, देवळे श्री. मुरुडकर यांनी २५,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली असल्याचे पडताळणीत निष्पन्न झालेले आहे.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार तक्रारदार यांचे वडीलोपार्जित शेत जमीन सातबारा उता-यावर फेरफार करुन तक्रारदार यांची सहहिस्सेदार म्हणुन घातलेली नोंद मंजुर करणेकरीता मंडळ अधिकारी श्री. मुरुडकर यांनी २५,०००/-रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन दिनांक २९/०३/२०२३ रोजी १४.१२ वाजता देवरुख येथील दिनोदय स्टोअर्स कडे जाणारे रोडवर पंचासमक्ष स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले. तसेच तलाठी मोघे यांनी दिनांक २८/०२/२०२३ रोजी मोबाईल फोनची मागणी केली म्हणुन त्यांना दिनांक २९/०३/२०२३ रोजी १४.५५ वा. पंचायत समिती देवरुख येथील आवारातुन पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी- १. मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, परिक्षेत्र ठाणे.**
**२.मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, परिक्षेत्र ठाणे.**

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्र विभाग यांचेशी संपर्क करावा.**

**संपर्क पत्ता - लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१**

**संकेतस्थळ - acbmaharashtra@mahapolice.gov.in**

**Email - spacbthane@mahapolice.gov.in**

**ॲप्लीकेशन- acbmaharashtra.net**

**टोल फ्रि नंबर- १०६४/ दुरध्वनी क्रमांक- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९**

**व्हॉट्सॲप क्रमांक - ९९३०९९७७००**

**प्रविण आ.ताटे**
**पोलीस निरीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी.**